श्री.संतोष डी कोकणी
कार्यालयीन अधिक्षक.

# (राष्ट्रीय निवृत्ती योजना)

# डि.सी.पी.एस./एन.पी.एस.
# शासन निर्णय नस्ती

Scanned by CamScanner

२८०९ ९०३

**राज्य शासनाच्या सेवेत १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी नवीन अंशदान निवृत्तिवेतन योजना लागू करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
शासन निर्णय, क्रमांक अंनियो १००५/१२६/सेवा-४,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ ऑक्टोबर २००५

## निर्णय

**प्रस्तावना**

केंद्र शासनाने, त्यांच्या सेवेमध्ये १ जानेवारी २००४ रोजी किंवा त्यानंतर नव्याने नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी नवीन अंशदान निवृत्तिवेतन योजना म्हणजेच "परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना" ( Defined Contribution Pension System ) शासन अधिसूचना, वित्त मंत्रालय, आर्थिक कार्य विभाग, दिनांक २२ डिसेंबर २००३ अन्वये लागू केली आहे. केंद्र शासनाने असेही जाहीर केले आहे की, राज्य शासनांनादेखील वर उल्लेखिलेल्या नवीन अंशदान निवृत्तिवेतन योजनेमध्ये सहभागी होण्याचा विकल्प उपलब्ध असेल. त्याचप्रमाणे या योजनेअंतर्गत निवृत्तिवेतन निधीचे व्यवस्थापन व विनियमन करण्यासाठी एका स्वतंत्र "निवृत्तिवेतन निधी विनियामक व विकास प्राधिकरणाची" ( Pension Fund Regulatory and Development Authority ) स्थापना केंद्र शासनाने केली आहे.

केंद्र शासनाच्या वरील नवीन अंशदान निवृत्तिवेतन योजनेच्या धर्तीवर राज्य शासनाच्या सेवेत नव्याने नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना नवीन अंशदान निवृत्तिवेतन योजना लागू करण्याबाबतचा प्रश्न या शासनाच्या विचाराधीन होता.

**निर्णय**

२. **(अ)** शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, शासन सेवेत १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी, सध्या अस्तित्वात असलेल्या निवृत्तिवेतन योजनेऐवजी, केंद्र शासनाच्या धर्तीवर, नवीन **"परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना"** (Defined Contribution Pension Scheme), खाली नमूद केल्यानुसार, लागू करण्यात येईल.

**(ब)** शासनाने असाही निर्णय घेतला आहे की, वरील नवीन परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजनेच्या अंमलबजावणीच्या प्रयोजनार्थ हे राज्य शासन केंद्र शासनाच्या, वर उल्लेखिण्यात आलेल्या, नवीन परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजनेमध्ये सहभागी होईल.

**(क)** शासनाने असाही निर्णय घेतला आहे की,

(i) सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तिवेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४)

आणि

(ii) सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना,

यांच्या तरतुदी, शासन सेवेत १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना लागू होणार नाहीत.

**नवीन निवृत्तिवेतन योजनेची ठळक वैशिष्ट्ये**

३. नवीन निवृत्तिवेतन योजनेची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :—

(अ) या योजनेस "परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना "(Defined Contribution Pension Scheme), असे संबोधण्यात येईल.

(ब) ही योजना दिनांक १ नोव्हेंबर २००५ पासून अंमलात येईल.

(क) नवीन परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर राज्य शासनाच्या सेवेत नियुक्त होणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी अनिवार्य असेल.



Scanned by CamScanner

**नवीन "परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागु असलेल्या कर्मचा-यांच्या सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी स्तर-२ मध्ये जमा करण्याबाबतची कार्यपध्दती**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**

शासन निर्णय, क्रमांक : अंनियो १०१०/प्र.क्र.६७/सेवा- ४
मंत्रालय, मुंबई - ४०० ३२, दिनांक १४ डिसेंबर,२०१०

**वाचा :** - १) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. अंनियो १००५/१२६/सेवा -४, दि. ३१ ऑक्टोबर २००५
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. अंनियो १००७/१८/सेवा -४, दि. ७ जुलै,२००७
३) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. वेपूर १२०९/प्र.क्र.६९/सेवा -९, दि. २९ एप्रिल,२००९

**प्रस्तावना**

संदर्भाधिन क्रमांक १ येथील दिनांक ३१ ऑक्टोबर २००५ च्या शासन निर्णयान्वये दिनांक १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना अंमलात आली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती संदर्भाधिन क्रमांक २ येथील दिनांक ७ जुलै २००७च्या शासन निर्णयान्वये ठरविण्यात आली आहे. ज्या शासकीय कर्मचा-यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागु आहे, अशा कर्मचा-यांना सहाव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीमुळे दि.१ जानेवारी, २००६ ते दि.३१.३.२००९ पर्यंतच्या कालावधीतील सुधारित वेतनाच्या थकबाकीची रक्कम त्यांच्या नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या खात्यात जमा करण्याच्या सूचना संदर्भाधिन क्रमांक ३ येथील दि.२९ एप्रिल, २००९ च्या परिपत्रकातील परि.१५.२ अन्वये देण्यात आल्या आहेत. संदर्भाधिन क्रमांक २ येथील दिनांक ७ जुलै २००७च्या शासन निर्णयातील परि. ६ (ब) स्तर-१ कार्यान्वित करण्यात आला असून त्यात जमा होणारी रक्कम आहरित करता न येण्याजोगी (non-withdrawable) आहे. त्यामुळे या योजनेतील आहरणयोग्य (withdrawable) असलेल्या स्तर-२ मध्ये थकबाकीची रक्कम जमा करण्याबाबतची कार्यपध्दती ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**

२. वरिल प्रस्तावनेला अनुलक्षुन शासन निर्णय वित्त विभाग, क्र. अंनियो १००५/१२६/सेवा -४, दि. ३१ ऑक्टोबर २००५ नुसार ज्या कर्मचा-यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागु केली आहे, अशा कर्मचा-यांना सहाव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीमुळे दि.१ जानेवारी, २००६ ते दि.३१.३.२००९ पर्यंतच्या कालावधीतील सुधारित वेतनाच्या थकबाकीची रक्कम जमा करण्याकरिता खालीलप्रमाणे कार्यवाही विहीत करण्यात येत आहे :

१) परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत स्तर-२ कार्यान्वित करण्यात येत असून त्यामध्ये पुढील आदेश होईपर्यंत केवळ कर्मचा-यांच्या दि.१ जानेवारी, २००६ ते दि.३१.३.२००९ पर्यंतच्या कालावधीतील सुधारित वेतनाच्या थकबाकीची व त्यावरील व्याजाची रक्कम जमा करण्यात येईल.

२) थकबाकीची रक्कम सन २००९-१० पासून स्तर-२ मध्ये जमा करण्याबाबतची कार्यवाही शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. वेपूर १२०९/प्र.क्र.६९/सेवा -९, दि. २९ एप्रिल,२००९ मधील परि.१५.१ (क) व परि.१५.३ मधील सूचनांप्रमाणे करण्यात यावी. जमा झालेली रक्कम ठरवून दिलेल्या कालावधीनंतर काढण्याकरिताच्या कार्यपध्दतीचे आदेश स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येतील.

३) दिनांक १ जानेवारी २००६ ते दि.३१ मार्च, २००९ या कालावधीत सेवात्याग केलेल्या/मृत्यु पावलेल्या कर्मचा-यांना थकबाकी अनुज्ञेय असल्यास त्याप्रकरणी शासन परिपत्रक, वित्त विभाग,क्र. वेपूर १२०९/प्र.क्र.६९/सेवा-९, दि.२९ एप्रिल,२००९



Scanned by CamScanner

मधील परि.१५.१ (ड), (ई) व (फ) मधील सूचनांप्रमाणे व शासन निर्णय वित्त विभाग क्र. अंनियो १००९/प्र.क्र. १/सेवा- ४, दि. १२ नोव्हेंबर,२०१० सोबतच्या जोडपत्र १ नुसार कार्यवाही करण्यात यावी.

४) स्तर -२ मध्ये जमा होणा-या रक्कमेचे लेखांकन व इतर कार्यपध्दतीबाबत राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे नियंत्रण असेल. राज्य अभिलेख देखभाल अभिकरणाकडून शासकीय कर्मचा-यांना त्यांच्या आहरण व संवितरण अधिका-यांमार्फत प्रत्येक वित्तीय वर्षांच्या अखेरीस वार्षिक विवरणपत्र पाठविण्यात येईल.

५) आहरण व संवितरण अधिका-यांनी वेतन देयकासोबत परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेखाली करण्यात आलेल्या वंजातीची अनुसूची जोडताना स्तर १ व स्तर २ खाली जमा होणा-या रकमा कर्मचा-यांच्या नावासमोर स्वतंत्रपणे दर्शविणे आवश्यक आहे. याकरिता परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना संगणक प्रणालीत स्तर-२ मध्ये जमा होणा-या रकमेची अनुसूची तयार करण्याबाबत उपलब्ध असलेल्या कार्यपध्दतीचा वापर करण्यात यावा.

६) परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेमधील स्तर २ मध्ये जमा होणारी रक्कम व त्यावरील व्याजाची रक्कम खालील लेखाशीर्षाखाली जमा करण्यात यावी.:-

"८३४२ इतर ठेवी,
(००) (११७) परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना
(०१)(०११) परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना, शासकीय कर्मचा-यांचे अंशदान, स्तर-२"
(८३४२-५२८-६)

७) प्रतिनियुक्तीवरील कर्मचा-यांच्या स्तर २ मध्ये जमा होणारी रक्कम व त्यावरील व्याजाची रक्कम खालील लेखाशीर्षाखाली जमा करण्यात यावी.:-

"८३४२ इतर ठेवी,
(००) (११७) परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना
(०२)(०११) परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना, शासकीय कर्मचा-यांचे अंशदान, स्तर-२"
(८३४२-५२९-५)

३. वरील कार्यपध्दती जिल्हा परिषदा, मान्यता प्राप्त व अनुदानित अशासकीय प्राथमिक व माध्यमिक शाळा, कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित मान्यता प्राप्त व अनुदानित अशासकीय महाविद्यालये तसेच कृषि विद्यापीठे इत्यांदीमधील कर्मचाऱ्यांना योग्य त्या फेरफारांसह लागू राहील. मात्र याबाबत स्वतंत्र सूचना संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी राज्य अभिलेख देखभाल अभिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई तसेच वित्त विभागाच्या मान्यतेने निर्गमित करण्याबाबतची कार्यवाही करावी.

४. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी हा शासन निर्णय त्यांच्या प्रशासकीय अधिपत्याखालील सर्व कार्यालयांच्या निदर्शनास आणण्याची कार्यवाही प्राथम्याने करावी.

५. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१०१२१५१९००४६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

अ. मु. सोलेगांवकर

**(अ.मु.सोलेगांवकर)**
**शासनाचे सह सचिव**

प्रति,
प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),
सर्व विभागीय आयुक्त (प्रत्येकी ५ प्रती),

gr&notification/dcpsrules

Scanned by CamScanner

राज्य शासनाची नवीन परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजना (DCPS) केंद्राच्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत (NPS) समाविष्ट करण्याबाबत

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

शासन निर्णय क्रमांकः अंनियो-२०१२/प्र.क्र.९६/सेवा-४

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

तारीख: २१ ऑगस्ट,२०१४.

वाचा — १)शासन निर्णय क्रमांकः अंनियो १००५/१२६/सेवा ४, दिनांक ३१/१०/२००५

२)शासन निर्णय क्रमांकः अंनियो १००७/१८/सेवा ४, दिनांक ०७/०७/२००७

**प्रस्तावना —**

संदर्भ क्रमांक १ येथे नमूद शासन निर्णयानुसार राज्य शासनाच्या सेवेत दि.१ नोव्हेंबर,२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचा-यांसाठी राज्यात केंद्र शासनाच्या धर्तीवर नवीन "परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना" राबविण्यात येत आहे. संदर्भ क्रमांक १ येथे नमूद शासन निर्णयानुसार या योजनेच्या अंमलबजावणीच्या प्रयोजनार्थ राज्य शासन केंद्र शासनाच्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत सहभागी होईल असाही निर्णय राज्य शासनाने घेतला आहे .

२. राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण, निधी व्यवस्थापक इत्यादींच्या नियुक्तीबाबत केंद्र शासनाने निर्णय घेतला नसल्यामुळे ही कार्यवाही होईपर्यंत संदर्भ क्रमांक २ येथे नमूद शासन निर्णयानुसार राज्य अभिलेख देखभाल अभिकरणाची स्थापना करुन त्यांच्या मार्फत सदर योजना राज्यात कार्यान्वित करण्यात आली आहे.

**शासन निर्णय—**

३. राज्य शासन, जिल्हा परिषदा, मान्यता प्राप्त व अनुदानित अशासकीय प्राथमिक व माध्यमिक शाळा, कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित मान्यता प्राप्त व अनुदानित अशासकीय महाविद्यालये, जलसंपदा विभागाअंतर्गत येणारी महामंडळे तसेच कृषि विद्यापीठे यांच्या सेवेत दिनांक १ नोव्हेंबर,

Scanned by CamScanner

राज्य शासनाची परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) केंद्राच्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत (NPS) समाविष्ट करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**

**वित्त विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः अंनियो-२०१२/प्र.क्र.९६/सेवा-४**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

तारीख: २७ ऑगस्ट, २०१४.

**वाचा**

१) शासन निर्णय क्रमांकः अंनियो १००५/१२६/सेवा ४, दिनांक ३१/१०/२००५

२) शासन निर्णय क्रमांकः अंनियो १००७/१८/सेवा ४, दिनांक ०७/०७/२००७

३) शासन निर्णय क्रमांकः अंनियो २०१२/प्र.क्र.९६/सेवा ४, दिनांक २१/०८/२०१४.

**प्रस्तावना**

संदर्भ क्रमांक १ येथे नमूद शासन निर्णयानुसार दि.१ नोव्हेंबर,२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी राज्यात केंद्र शासनाच्या धर्तीवर "परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना" लागू करण्यात आली. राज्य शासन केंद्र शासनाच्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत सहभागी होईल असाही निर्णय राज्य शासनाने घेतला.

२. राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण, निधी व्यवस्थापकांच्या नियुक्तीबाबत केंद्र शासनाने निर्णय घेतला नसल्यामुळे ही कार्यवाही होईपर्यंत, संदर्भ क्रमांक २ येथे नमूद शासन निर्णयानुसार राज्य अभिलेख देखभाल अभिकरणाची स्थापना करुन त्यांच्या मार्फत सदर योजना राज्यात कार्यान्वित करण्यात आली आहे.

Scanned by CamScanner

नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना
जमा झालेल्या अंशदानावर सन २०१४-१५
करीता व्याज दर

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
**शासन निर्णय क्रमांकः अंनियो २०१५/ प्र.क्र.२८/सेवा- ४**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: २७ मार्च, २०१५.

**वाचा -**

१) **शासन निर्णय वित्त विभाग क्रमांकः अंनियो १००५/१२६/सेवा -४, दि. ३१ ऑक्टोबर २००५.**

२) **शासन निर्णय वित्त विभाग क्रमांकः अंनियो १०१०/प्र.क्र.६७/सेवा -४, दि. १४ डिसेंबर, २०१०.**

३) **शासन निर्णय वित्त विभाग क्रमांकः अंनियो २०१३/ प्र.क्र.७८/सेवा- ४, दि. १२ फेब्रुवारी, २०१४.**

**प्रस्तावना -**

संदर्भाधिन क्रमांक १ येथील शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. अंनियो १००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१ ऑक्टोबर २००५ अन्वये नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत स्तर-१ मध्ये प्रत्येक शासकीय कर्मचाऱ्याचे मूळ वेतन अधिक महागाई वेतन (असल्यास) अधिक महागाई भत्ता या रकमेच्या १०% इतके मासिक अंशदान व राज्य शासनाकडून समतुल्य अंशदान जमा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच संदर्भाधिन क्रमांक २ येथील शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. अंनियो १०१०/प्र.क्र.६७/सेवा -४, दि.१४ डिसेंबर, २०१० अन्वये सहाव्या वेतन आयोगाच्या थकबाकीची रक्कम नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या स्तर-२ मध्ये जमा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या स्तर-१ व स्तर-२ मध्ये सन २०१४-१५ मध्ये जमा झालेल्या रकमांवर व्याज देण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय-**

शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत स्तर-१ मध्ये शासकीय कर्मचाऱ्यांकडून वसुल केलेल्या तसेच राज्य शासनाच्या समतुल्य अंशदानापोटी जमा झालेल्या एकत्रित रकमेवर सन २०१४-२०१५ या वित्तीय वर्षाकरीता सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीकरीता ठरविण्यात आलेल्या व्याज दराने म्हणजेच दि.०१.०४.२०१४ पासून ८.७ % दराने व्याज देण्यात यावे. व्याज जमा करण्यासंदर्भातील कार्यवाही राज्य अभिलेख देखभाल अभिकरणाकडून करण्यात येईल.

२. सहाव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या स्तर-२ मध्ये सन २०१४-१५ मध्ये थकबाकीची रक्कम जमा झालेली असल्यास या जमा झालेल्या थकबाकीच्या रकमेवर देखील दि.०१.०४.२०१४ पासून ८.७ % दराने व्याज देण्यात यावे. व्याज जमा करण्यासंदर्भातील कार्यवाही राज्य अभिलेख देखभाल अभिकरणाकडून करण्यात येईल.

३. वरील कार्यपध्दती जिल्हा परिषदा, मान्यता प्राप्त व अनुदानित अशासकीय प्राथमिक व माध्यमिक शाळा, कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित मान्यता प्राप्त व अनुदानित अशासकीय महाविद्यालये तसेच कृषि विद्यापीठे इत्यांदीमधील कर्मचाऱ्यांना योग्य त्या फेरफारांसह लागू राहील.

Scanned by CamScanner

राज्य शासनातील कर्मचाऱ्यांना तसेच महाराष्ट्र संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांना लागु असलेल्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन (NPS) योजनेबाबतची (स्तर-१)कार्यपध्दती

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांकः अंनियो-२०१५/(NPS)/प्र.क्र.३२/सेवा-४
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: ०६ एप्रिल, २०१५.

वाचा -

१) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांकः अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दि.३१.१०.२००५.

२) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांकः अंनियो-१००७/१८/सेवा-४, दि.०७.०७.२००७.

३) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांकः अंनियो-१००७/प्र.क्र.६९/सेवा-४, दि.३०.०१.२००९.

४) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांकः अंनियो-१००९/प्र.क्र.०१/सेवा-४, दि.१२.११.२०१०.

५) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांकः अंनियो-१०१०/प्र.क्र.६७/सेवा-४, दि.१४.१२.२०१०

६) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांकः भाप्रसे-२५०६/प्र.क्र.३६०/०६/०९, दि.१५.०२.२०१३

७) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांकः भाप्रसे-२५०६/प्र.क्र.३६०/०६/०९, दि.०१.०८.२०१३.

८) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांकः संकीर्ण-१००९/प्र.क्र.३९/कोषा-प्रशा-५, दि.०४.१०.२०१३.

९) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांकः भाप्रसे-२५०९/प्र.क्र.३६५/०९/०९, दि.११.०२.२०१३.

१०) सामान्य प्रशासन विभाग शुध्दीपत्र क्रमांकः भाप्रसे-२५०९/प्र.क्र.३६५/०९/०९, दि.१०.०३.२०१४.

११) सामान्य प्रशासन विभाग शासन पूरकपत्रक क्रमांकः भाप्रसे-२५०६/प्र.क्र.३६०/०६/०९, दि.२४.०३.२०१४.

१२) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांकः अंनियो-२०१४/प्र.क्र.४५/सेवा-४. दि.०८.०५.२०१४.

Scanned by CamScanner

राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत शासनास शिफारशी करण्यासाठी समितीची स्थापना करणे.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:- लवेसू-२०१६/प्र.क्र.२७/सेवा-४**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: १३ जुलै, २०१६.

**प्रस्तावना :-**

शासनसेवेत दि.१/११/२००५ नंतर रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना "नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना" लागू आहे. सदर योजनेनुसार सेवा संपल्यानंतर किंवा सेवेत मृत्यु झाल्यास अशा कर्मचाऱ्यांना त्यांचा हिस्सा + राज्य शासनाचे समतुल्य अंशदान + त्यावरील व्याज देण्यात येते. तथापि कमी सेवा होऊन मृत्यु झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना कमी रक्कम प्राप्त होते. अशा कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांस आर्थिक दृष्टया कशी व कोणती मदत करता येऊ शकेल या विषयावर विधानपरिषदेमध्ये सविस्तर चर्चा झाली असता मा. राज्यमंत्री (वित्त) यांनी या विषयाचा आढावा घेण्यासाठी समिती स्थापन करण्याचे सूचित केले होते. यानुसार अशी समिती स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :**

दि.१/११/२००५ नंतर राज्य शासनाच्या सेवते रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू आहे. सदर योजनेनुसार दि. १/११/२००५ नंतर सेवेत रुजू झालेला कर्मचारी सेवेत असताना मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्याच्या कुटूंबियांना काय लाभ दयावेत याविषयी सल्ला देण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव | पदनाम | |
|---|---|---|---|
| १ | मा.मंत्री (वित्त) | अध्यक्ष | अशासकीय सदस्य |
| २ | मा.राज्यमंत्री (वित्त) | उपाध्यक्ष | |
| ३ | ॲड. श्री.अनिल परब (वि.प.स.) | सदस्य | |
| ४ | श्री. श्रीकांत देशपांडे (वि.प.स.) | सदस्य | |
| ५ | प्रधान सचिव (वि.सु.) | सदस्य | शासकीय सदस्य |
| ६ | प्रधान सचिव (शालेय शिक्षण विभाग) | सदस्य | |
| ७ | राज्य अभिलेख देखभाल अभिकरण | सदस्य तथा नोडल अधिकारी | |
| ८ | उपसचिव (निवृत्तीवेतन) | सदस्य सचिव | |

विषयांकित प्रकरणी समितीने त्यांचा अहवाल समिती स्थापन झाल्यापासून १ वर्षाच्या आत शासनास सादर करावा.

Scanned by CamScanner

राज्य शासनाची परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) केंद्राच्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत (NPS) समाविष्ट होण्यासंदर्भात स्पष्टीकरण व संबंधित प्रशासकीय विभागांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**वित्त विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण २०१७ /प्र. क्र.६८/सेवा ४**

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: १०/०७/२०१७

**वाचा -**

१) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक :अंनियो-२००५/प्र. क्र.१२६/सेवा ४, दिनांक ३१.१०.२००५

२) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक :अंनियो-२०१२/प्र. क्र.९६/सेवा ४, दिनांक २७.०८.२०१४

३) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक :अंनियो-२०१५/(NPS)/प्र. क्र.३२/सेवा ४, दिनांक ०६.०४.२०१५

**प्रस्तावना-**

उपरोक्त संदर्भ क्रमांक-१ च्या शासन निर्णयान्वये दिनांक १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणा-या कर्मचा-यांसाठी केंदशासनाच्या धर्तीवर परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू करण्यात आली. केंद्रशासनाच्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत सहभागी होईल असा निर्णय राज्य शासनाने घेतला.राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत सहभागी होतेवेळी योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण व निधी व्यवस्थापकांच्या नियुक्तीबाबत केंद्रशासनाने निर्णय घेतला नव्हता. त्यामुळे राज्य शासनाने राज्य अभिलेख देखभाल अभिकरणाची स्थापना करून त्यामार्फत सदर योजना कार्यान्वित केली. संदर्भ क्रमांक ३ च्या शासन निर्णयान्वये राज्य शासनातील कर्मचा-यांना तसेच महाराष्ट्र संवर्गातील अखिल भारतीय सेवेतील अधिका-यांना लागू असलेल्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन (NPS) योजनेबाबतची (स्तर१) ची कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे.

परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना व राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना या अनुक्रमे उपरोक्त संदर्भ क्रमांक-१ व संदर्भ क्रमांक-२ च्या शासन निर्णयान्वये याआधीच जिल्हा परिषदा,सर्व मान्यताप्राप्त व अनुदानित शैक्षणिक संस्था,कृषी/कृषीतर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित मान्यता प्राप्त व अनुदानित अशासकीय महाविदयालये यांना लागू करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने या संस्था ज्या प्रशासकीय विभागांच्या अधिनस्त आहेत त्या विभांगानी राष्ट्रीय निवृत्तीवेतन (NPS) योजनेमध्ये समाविष्ठ होऊन स्तर१ ची कार्यपदधती विहीत करणे क्रमप्राप्त होते.तथापि संबंधित विभागांकडून या प्रकरणी अपेक्षित कार्यवाही झालेली नाही.राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत वेळेत समावेशन न झाल्यामुळे राज्यशासनाला व्याजाचा अनावश्यक आर्थिक भार सोसावा लागत आहे.सबब यासंदर्भात संबंधित प्रशासकीय विभागांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

Scanned by CamScanner

राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेच्या अंमलबजावणीबाबत
राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचे सभासदत्व संपुष्टात
आल्याने देय ठरणाऱ्या लाभांबाबत

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : अंनियो-२०१७ /प्र. क्र.२६/सेवा ४**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: २८ जुलै, २०१७

**वाचा -**

१) शासन निर्णय क्रमांकः अंनियो-२०१५/ (NPS)/प्र. क्र.३२/सेवा ४,दिनांक ०६.०४.२०१५.
२) शासन निर्णय क्रमांकः अंनियो-२००९ /प्र. क्र.०१/सेवा ४,दिनांक १२.१०.२०१०.
३) शासन निर्णय क्रमांकः अंनियो-२०१४ /प्र. क्र.४५/सेवा ४, दिनांक ०८.०५.२०१४.
४) निवृत्तीवेतन निधी विनियामक व विकास प्राधिकरण यांचेकडील अधिसूचना दिनांक ११.०५.२०१५.

**प्रस्तावना -**

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ०१/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेच्या स्तर - १ ची अंमलबजावणी दिनांक ०१.०४.२०१५ पासुन करण्याची कार्यपध्दती विहित करण्यांत आली आहे.

**संदर्भ क्रमांक २ व ३ च्या शासन निर्णयान्वये परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेतील सभासदांचे सदस्यत्व संपुष्टात आल्यावर परतावा देण्याबाबतची कार्यपध्दती विषद करण्यात आली आहे. सदरची कार्यपध्दती दिनांक ३१.०३.२०१५ पर्यंत योजनेचे सदस्यत्व संपुष्टात आलेल्या प्रकरणांना लागु करण्यांत आली आहे. दिनांक ०१.०४.२०१५ पासुन राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेची अंमलबजावणी सुरु झाल्यामुळे या दिनांकापासुनच सेवा समाप्त होणाऱ्या प्रकरणांना निवृत्तीवेतन निधी विनियामक व विकास प्राधिकरण (PFRDA) यांनी निर्गमित केलेल्या सूचनांप्रमाणे केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण यांच्या संकेतस्थळावरील सुविधांचा वापर करुन कर्मचारी, आहरण व संवितरण अधिकारी व कोषागार अधिकारी यांनी कार्यवाही करावयाची आहे.**

तथापि याबाबत संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयान्वये निर्देश देवुनही प्रत्यक्ष अंमलबजावणी मध्ये काही शंका आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडून प्राप्त झाल्याने या प्रकरणी पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

Scanned by CamScanner

राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेच्या अंमलबजावणीबाबत स्वियेत्तर सेवेत प्रतिनियुक्तीवर कार्यरत राज्य शासकीय कर्मचाऱ्याची राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेमध्ये नोंदणी करणे व अंशदाने जमा करणेबाबत स्वियेत्तर सेवेत पाठविणाऱ्या विभागाने व कोषागाराने करावयाच्या कार्यवाहीबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**वित्त विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांक : अंनियो-२०१७ /प्र. क्र.२७/सेवा ४**

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: २८ जुलै, २०१७

**वाचा -**

१) **शासन निर्णय क्रमांकः अंनियो-२०१५/ (NPS)/प्र. क्र.३२/सेवा ४,दिनांक ०६.०४.२०१५.**

**प्रस्तावना -**

उपरोक्त संदर्भांकित शासन निर्णयान्वये राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेची अंमलबजावणीची कार्यपध्दती विषद करण्यात आलेली आहे. दिनांक ०१/०४/२०१५ पासुन सदरची अंमलबजावणी सुरु होऊनही आजमितीस स्वियेत्तर सेवेतील कर्मचाऱ्यांची राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेत नोंदणी संबधित नियुक्ती प्राधिकरणाकडून पूर्ण झाली नसल्याचे आढळून येत आहे. तसेच काही प्रकरणी स्वियेत्तर सेवेतील कार्यालयाचे अंशदान अप्राप्त असल्याने संबधित कर्मचाऱ्यांची अंशदाने केंद्रीय देखभाल अभिकरणाकडे कोषागारांना वर्ग करता आली नाहीत. उपरोक्त शासन निर्णयातील परिच्छेद १४, ३०, ३१, ३९, ४०, व ४१ अन्वये विहीत कार्यपध्दती विषद केलेली आहे. स्वियेत्तर सेवेकडे शासकीय कर्मचाऱ्याच्या सेवा वर्ग करणाऱ्या विभागातील आहरण व संवितरण अधिकारी व कोषागार अधिकारी यांना संबधित कर्मचाऱ्यांचे नोंदणीच्या अनुषंगाने सेवार्थ प्रणालीतील उपलब्ध सुविधांव्दारे करावयाच्या कार्यपध्दतीबाबत पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहे.

## शासन परिपत्रक -

स्वियेत्तर सेवेतील कर्मचाऱ्यांचे वेतन हे सेवार्थ प्रणालीतून आहरीत होत नसल्याने, त्यांच्या राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेतील नोंदणीबाबतची कार्यवाही, ही उपरोक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार स्वियेत्तर सेवेत पाठविणाऱ्या सक्षम प्राधिकरणास करणे आवश्यक आहे.

सद्यस्थितीत खालील ३ प्रकारामुळे स्वियेत्तर सेवेतील कर्मचाऱ्यांचे व अधिकाऱ्यांचे राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेतील नोंदणी करणे व अंशदाने वर्ग होणेबाबतची कार्यवाही प्रलंबित असल्याचे दिसून आलेले आहे.

Scanned by CamScanner

राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेच्या अंमलबजावणीबाबत डिसीपीएस/एनपीएस मधील वार्षिक विवरणपत्रातील त्रुटींचे निराकरणाबाबत आहरण व संवितरण अधिकारी व कोषागार अधिकारी यांनी अवलंब करावयाच्या कार्यपध्दतीबाबत तसेच इतर संकीर्ण सूचनांबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**वित्त विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांक : अंनियो-२०१७ /प्र. क्र.२८/सेवा ४**

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,

वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

तारीख: २८ जुलै, २०१७

**वाचा -**

१) **शासन निर्णय क्रमांकः अंनियो-२०१५/ (NPS)/प्र. क्र.३२/सेवा ४,दिनांक ०६.०४.२०१५.**

**प्रस्तावना -**

राज्य शासनाची परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना केंद्र शासनाच्या राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेत दि.०१/०४/२०१५ पासुन समाविष्ट करण्यात आली आहे. या संदर्भात केंद्र शासनाने स्थापित केलेल्या निवृत्तीवेतन निधी विनियामक व विकास प्राधिकरण (PFRDA) यांच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे कार्यपध्दतीची अंमलबजावणी करण्याबाबत राज्य शासनाने, राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना विश्वस्त मंडळ व त्यांनी नेमलेल्या केंद्रीय देखभाल अभिकरणासोबत करार केला आहे. त्या अन्वये निवृत्तीवेतन निधी विनायमक व विकास प्राधिकरण (PFRDA) ने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सुचनांची अंमलबजावणी राज्याने करणे बंधनकारक आहे.

दि.०६ एप्रिल २०१५ च्या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची कार्यपध्दती विषद केलेली आहे. त्यानुसार राज्यात विकेंद्रीत कार्यपध्दतीव्दारे राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचे कामकाज करण्यात येत आहे. योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी करतांना मिंसिग क्रेडीट व स्तर-२ च्या रक्कमा स्तर-१ मध्ये वर्गीकृत झाल्यास, अशा त्रुटींच्या निराकरणासाठी अवलंब करावयाच्या कार्यपध्दतीबाबत आहरण व संवितरण अधिकारी व योजनेचे जिल्हा स्तरावरील समन्वय अधिकारी म्हणजे जिल्हा कोषागार अधिकारी यांना पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत आहे.

**शासन परिपत्रक -**

१) **परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या वार्षिक विवरणपत्रातील मिसींग क्रेडीट व स्तर-२ च्या रक्कमा स्तर-१ मध्ये वर्गीकृत झाले असल्यास त्यांच्या दुरुस्तीबाबत:-**

शासन निर्णय दिनांक ०७/०७/२००७ अन्वये परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती विषद केलेली आहे. त्याप्रमाणे कर्मचाऱ्यांस मिळणाऱ्या वार्षिक विवरणपत्रात (आर-३) जमा असलेल्या रक्कमांबाबत काही त्रुटी असल्यास आहरण व संवितरण अधिकारी यांनी त्रुटींची दुरुस्ती, कोषागाराशी संपर्क साधुन वेळीच करणे गरजेचे होते. शासन निर्णय दिनांक ०६/०४/२०१५ मधील परिच्छेद ४८ अन्वये याकडे पुनश्च लक्ष वेधण्यांत आले आहे. परंतु आज मितीस अशी कार्यवाही बऱ्याच कार्यालयांकडून झालेली नसल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या वार्षिक विवरणपत्रातील त्रुटी दुरुस्त होऊ शकल्या

Scanned by CamScanner

राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेच्या अंमलबजावणीबाबत
राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचे सभासदत्व संपुष्टात
आल्याने देय ठरणाऱ्या लाभांबाबत.

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग
शासन शुध्दिपत्रक क्रमांक : अंनियो-२०१७/प्र. क्र.२६/सेवा ४
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: ११ जानेवारी, २०१८

वाचा -

शासन परिपत्रक क्रमांक : अंनियो-२०१७/प्र. क्र.२६/सेवा ४, दिनांक २८.०७.२०१७

शासन शुद्धिपत्रक -

दिनांक ०६.०४.२०१५ च्या शासन निर्णयान्वये दि. ०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेच्या स्तर-१ ची अंमलबजावणी दि. ०१.०४.२०१५ पासुन करण्याची कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. तसेच दि. २८/०७/२०१७ च्या शासन परिपत्रकान्वये राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेच्या अंमलबजावणीबाबत आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेल्या शंकांच्या अनुषंगाने मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर सुचनांमध्ये याद्वारे पुढीलप्रमाणे बदल/सुधारणा करण्यात येत आहे.

१) उपरोक्त दिनांक २८/०७/२०१७ च्या शासन परिपत्रकातील वाचा मधील क्रमांक २ च्या शासन निर्णयाचा दिनांक १२/१०/२०१० ऐवजी १२/११/२०१० असा वाचावा.

२) उपरोक्त दिनांक २८/०७/२०१७ च्या शासन परिपत्रकातील परिच्छेद १ (अ) मध्ये नमूद केल्याप्रमाणे शासन निर्णय दिनांक ०६/०४/२०१५ अनुसार कोषागार अधिकारी यांनी दिनांक ०१/०४/२०१५ व त्यानंतर भविष्य निर्वाह निधी योजना लागू झालेल्या प्रकरणी जी पद्धती वापरण्याच्या सूचना आहेत तीच कार्यपद्धती दिनांक ३१/०३/२०१५ पर्यंत भविष्य निर्वाह निधी योजना लागू झालेल्या प्रकरणीही वापरणे अभिप्रेत आहे.

३) दिनांक २८/०७/२०१७ च्या शासन परिपत्रकातील परिच्छेद १ (ब) मध्ये राज्य अभिलेख देखभाल अभिकरण कार्यालयाकडून दिनांक ०१/०४/२०१५ व त्यानंतर सेवा समाप्त झालेल्या सभासदांच्या स्तर-२ मधील रक्कमांबाबत "नमुना ई" निर्गमीत करतील असे नमूद आहे. त्याअनुषंगाने स्तर-२ च्या रक्कमांच्या मंजूरीसाठी "नमुना ई" आदेशाचे प्रारूप सोबत जोडण्यात येत आहे.

४) दिनांक २८/०७/२०१७ च्या शासन परिपत्रकातील परिच्छेद १ (क) प्रमाणे परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेअंतर्गत ज्या परतावा प्रकरणांत ERM ची कार्यवाही आवश्यक आहे ( ज्या सभासदांना प्रान क्रमांक संस्करित झालेला आहे व त्यांचे प्रान खात्यावर रक्कमा केंद्रीय देखभाल अभिकरणाकडे वर्ग झालेल्या आहेत अशा सर्व प्रकरणी मंजूर अथवा मंजूरीसाठी प्रलंबित असलेल्या सर्व प्रकरणांत ) ERM ची कार्यवाही संबंधीत कोषागार अधिकारी (DTO) यांनी प्रस्तावित करणे अभिप्रेत आहे. तसेच ERM ने मागविण्यात आलेली रक्कम Redemption Value प्रमाणे दोन भागात सभासदाचा हिस्सा व शासनाचा हिस्सा ( Employee Contribution & Employer Contribution) यासाठी विहीत केलेल्या लेखाशिर्षाखाली अनुक्रमे ८३४२५०८१ व ८३४२५०९९ खाली जमा करणे अभिप्रेत आहे.

Scanned by CamScanner

# नमुना क्रमांक- ई (स्तर-२)

SRKA/२०१७- २०१८/Terminal Process/
**DCPS स्तर-२/**
**श्री./श्रीमती.......................................**
राज्य अभिलेख देखभाल अभिकरण,
नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना,
संचालनालय, लेखा व कोषागारे,
ठाकरसी हाऊस,तिसरा मजला,मुंबई पोर्ट ट्रस्ट
जवळ,शूरजी वल्लभदास मार्ग, बॅलार्ड इस्टेट,
फोर्ट, मुंबई ४०० ००१.
दिनांक-

वाचा: (१) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अंनियो १००९/ प्र.क्र. ६१/ सेवा- ४ दिनांक १२/११/२०१०
(२) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अंनियो -२०१५/ (NPS)/प्र.क्र. ३२/ सेवा- ४ दिनांक ०६/०४/२०१५.
(३) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अंनियो -२०१७/प्र.क्र. २८/ सेवा- ४ दिनांक २८/०७/२०१७.
(४) ...................................................... आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडून परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या स्तर २ च्या रकमेचा परतावा मिळणेकरीता प्राप्त झालेला अर्ज.
(५) **श्री./श्रीमती.................................................**यांचा परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या स्तर २ च्या रकमेचा परतावा मिळण्याकरिता प्राप्त झालेला दि.................... रोजीचा अर्ज.
(६) **जिल्हा कोषागार कार्यालय,** ..............................यांचे परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या स्तर २ च्या जमा रकमेबाबतचे विवरणपत्र. (नमुना- ड)

**आ दे श**

उपरोक्त क्रमांक ४ अन्वये ..............................................................यांच्याकडून प्राप्त झालेल्या परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या स्तर २ च्या रकमेच्या परतावा प्रस्तावासोबत **श्री./श्रीमती**...........................................................यांचा वर क्रमांक ५ येथे नमूद केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने आणि क्रमांक ६ येथील **जिल्हा कोषागार कार्यालय,** ...................... यांच्या विवरणपत्राच्या अनुषंगाने, उपसंचालक, राज्य अभिलेख देखभाल अभिकरण हे त्यांना संदर्भ क्रमांक – १,२, व ३ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, **श्री./श्रीमती**.........................................................यांच्या लेख्यामध्ये त्यांच्या सेवासमाप्तीच्या ...................... दिनांकापर्यंत जमा झालेल्या परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या स्तर २ च्या रकमेच्या परतावा **रक्कम रु.** ................... **(अक्षरी रक्कम रुपये** ........................................ **फक्त) श्री./श्रीमती**............................................... यांस मंजूर करित आहेत.

सदर परतावा शासकीय कर्मचारी ...................... **या कारणास्तव** मंजूर करण्यात येत आहे. सदरचा खर्च (८३४२ ००८८) या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

**उपसंचालक,**
राज्य अभिलेख देखभाल अभिकरण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत: १) **जिल्हा कोषागार कार्यालय,** ........................यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव
२) ...................................................... (आहरण व संवितरण अधिकारी)यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
३) **श्री./श्रीमती**...............................**पत्ता** ............................. यांना माहितीस्तव.

Scanned by CamScanner

परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेंतर्गत योजनेच्या सभासदाचा सेवा कालावधीत मृत्यु झाल्यास त्याच्या कुटुंबियांना द्यावयाच्या सानुग्रह अनुदान व लाभाबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**वित्त विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : अंनियो-२०१७/प्र.क्र.२९/सेवा ४**

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: २९ सप्टेंबर, २०१८.

**<u>प्रस्तावना :</u>**

दिनांक ०१.११.२००५ रोजी व त्यानंतर राज्य शासनाच्या सेवेत रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना शासन निर्णय वित्त विभाग, क्रमांक : अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१.१०.२००५ अन्वये नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू करण्यात आली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : अंनियो-१००७/१८/सेवा-४, दि.७.७.२००७ अन्वये ठरविण्यात आली आहे.

तसेच शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक : अंनियो-२०१२/प्र.क्र.९६/सेवा-४, दि.२७.०८.२०१४ अन्वये सदरची योजना केंद्राच्या धर्तीवर राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत समाविष्ट केलेली आहे. दिनांक ०१.११.२००५ रोजी व त्यानंतर शासकीय सेवेत रुजू झालेल्या परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना / राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू असलेल्या कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ च्या तरतुदी लागू होत नाहीत. त्यामुळे त्यांना निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतन, मृत्यु-नि-सेवा उपदान व भविष्य निर्वाह निधीचे लाभ अनुज्ञेय ठरत नाहीत. दिनांक ३१.०३.२०१५ पर्यंत परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना कार्यान्वित असल्याने कर्मचाऱ्यास त्याचे स्वत:चे अंशदान अधिक राज्य शासनाचे समतुल्य अंशदान व त्यावरील व्याज भविष्य निर्वाह निधीच्या दराने देय केले आहे व या योजनेचे सदस्यत्व संपुष्टात आल्यास या कर्मचाऱ्यांना त्यांच्या खात्यावर जमा असलेल्या रकमांचे परतावे देण्यात येतात. या योजनेमध्ये कर्मचाऱ्यांची रक्कम वार्षिक योजनेमध्ये (Annuity Plan) गुंतविण्याची तरतूद नसल्याने त्यांच्या खात्यावर जमा असलेल्या रकमेशिवाय त्यास इतर कोणतेही लाभ देय होत नाहीत.

दिनांक ०१.०४.२०१५ पासून राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना कार्यान्वित झाली आहे. राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत कर्मचाऱ्यांना वेतनातून कपात झालेल्या अंशदानावर शासनाचे सममूल्य अंशदान देण्यात येते. सदरची अंशदाने निवृत्तीवेतन निधी विनियामक व विकास प्राधिकरणाने नेमलेल्या निधी व्यवस्थापकामार्फत गुंतवणूकीसाठी उपलब्ध करुन देण्यात येतात. या रकमा कर्मचाऱ्यांचे योजनेचे सदस्यत्व, मृत्यु, सेवानिवृत्ती, राजीनामा इत्यादी कारणामुळे संपुष्टात आल्यावर निवृत्तीवेतन निधी विनियामक व विकास प्राधिकरणाने ठरविलेल्या नियमानुसार वार्षिक योजना (Annuity Plan) मध्ये गुंतविण्यात येवून त्यावर कर्मचाऱ्यास / त्याच्या वारसास मासिक निवृत्तीवेतन विषयक लाभ देण्याची तरतूद आहे. परंतु मृत्यु झाल्यास सद्यस्थितीत कोणतीही वार्षिक योजना (Annuity Plan) कार्यान्वित नसल्याने कर्मचाऱ्यास त्याच्या खात्यावर जमा झालेला सर्व संचित निधी दिला जातो.

Scanned by CamScanner

सदर योजनेच्या सभासदाचा सेवेत असतांना अल्प सेवा होऊन मृत्यु झाल्यास, सदर कर्मचाऱ्याच्या कुटुंबियांस त्याच्या खाती जमा असणाऱ्या संचित निधी व्यतिरिक्त इतर कोणतेही लाभ मिळत नाहीत. त्यामुळे अशा कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिकदृष्टया मदत करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते. याबाबत सर्वंकष विचार करून शासन आता खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

## शासन निर्णय -

"दिनांक ०१.११.२००५ रोजी व त्यानंतर राज्य शासनाच्या सेवेत नियुक्त झालेल्या व परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना / राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचा सदस्य असणारा कर्मचारी १० वर्षे सेवा होण्यापूर्वी सेवेत असतांना मृत्यु पावल्यास, त्याच्या नामनिर्देशित व्यक्तीस, नामनिर्देशन केले नसल्यास त्याच्या कायदेशीर वारसास सानुग्रह अनुदान रु.१० लक्ष अधिक कर्मचाऱ्याच्या खाती जमा असलेली संचित रक्कम देण्यात यावी."

२. दिनांक ०१.११.२००५ रोजी व त्यानंतर राज्य शासनाच्या सेवेत नियुक्त झालेला कर्मचारी जर परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना / राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचा सदस्य होण्यास पात्र असेल, परंतु त्याचे खाते उघडण्याची जबाबदारी ज्या कार्यालयाची आहे, त्या कार्यालयांनी ती पार पाडली नसेल किंवा सदर कर्मचाऱ्याचा दोष नसतांना काही अपरिहार्य कारणास्तव त्याचे खाते उघडले गेले नसेल अशा कर्मचाऱ्याच्या नामनिर्देशित व्यक्तीस, नामनिर्देशन केले नसल्यास त्याच्या कायदेशीर वारसास देखील रु.१० लक्ष इतके सानुग्रह अनुदान अनुज्ञेय राहील. मात्र अशा प्रकरणांना मान्यता देण्यापूर्वी वित्त विभागाची सहमती घेणे आवश्यक असेल.

३. शासन असाही आदेश देत आहे की, जिल्हा परिषदा, मान्यता प्राप्त व अनुदानित अशासकीय प्राथमिक व माध्यमिक शाळा, कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित असलेली अनुदानित अशासकीय महाविद्यालये तसेच कृषी विद्यापीठे व तत्सम अनुदानित संस्थांमधील कर्मचाऱ्यांना वरील निर्णय, योग्य त्या फेरफारांसह, लागू राहील. मात्र याबाबत स्वतंत्र आदेश संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागाने निर्गमित करण्याबाबतची कार्यवाही करावी.

४. या शासन निर्णयाद्वारे अनुज्ञेय होणाऱ्या सानुग्रह अनुदानाच्या लाभ -

अ) परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना / राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू असलेल्या कर्मचाऱ्याच्या राज्य शासनाच्या सेवेत असताना १० वर्षे सेवा पूर्ण होण्यापूर्वी मृत्यु झाल्यास, त्या कर्मचाऱ्याने नामनिर्देशित केलेली व्यक्तीस अथवा

ब) जर त्या कर्मचाऱ्याने नामनिर्देशन केले नसेल तर त्याच्या कायदेशीर वारसास अनुज्ञेय राहील.

५. या शासन निर्णयान्वये अनुज्ञेय ठरणारे सानुग्रह अनुदान मंजूरीचे अधिकार संबंधित प्रशासकीय विभाग प्रमुख यांना राहतील. त्यांना हे अधिकार त्यांच्या दुय्यम अधिकाऱ्यास प्रत्यार्पित करता येणार नाहीत.

६. सदर योजनेची कार्यपध्दती सोबत जोडलेल्या "जोडपत्र" व परिशिष्ट क्रमांक १ ते ३ प्रमाणे अंमलात आणावी.

७. या प्रयोजनार्थ येणारा खर्च पुढील लेखाशीर्षाखाली नमुद केलेल्या तरतूदीतून करण्यात यावा.

Scanned by CamScanner

मागणी क्र.जी-६
२०७१-निवृत्तीवेतन व इतर सेवानिवृत्ती लाभ
०१ नागरी
१०३, अनुकंपा भत्ते
(००)(०६)-परिभाषित अंशदान / राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेंतर्गत सानुग्रह अनुदान
(२०७१०७२२)

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०९२९१५१८४७८९०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anudeep Shrinivas Dighe

Digitally signed by Anudeep Shrinivas Dighe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=75f50c6671abf79e06e7d05c1127cdae17ad6b947f5b0d740fa705326fedc741, cn=Anudeep Shrinivas Dighe
Date: 2018.09.29 15:23:56 +05'30'

(अनुदीप दिघे)
शासनाचे उप सचिव

प्रति,

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (१००० प्रती),
... नागपूर(१००० प्रती),

Scanned by CamScanner

(वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक -अंनियो-२०१७/प्र.क्र.२९/सेवा-४, दि.२९.०९.२०१८
निर्दिष्ट केलेले जोडपत्र.)

## जोडपत्र

**परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना / राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेचा सदस्य असणारा शासकीय कर्मचारी १० वर्ष सेवा होण्यापूर्वी सेवेत असतांना मृत्यू पावल्यास त्याच्या नामनिर्देशित व्यक्तीस / कायदेशीर वारसास सानुग्रह अनुदान रुपये १० लक्ष मंजूर करण्या संदर्भात करावयाची कार्यवाही.**

१) **कर्मचाऱ्याच्या नामनिर्देशित व्यक्तीने / कायदेशीर वारसाने करावयाची कार्यवाही:-** परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू असलेल्या शासकीय कर्मचाऱ्याचा १० वर्ष सेवा होण्यापूर्वी सेवेत असताना मृत्यू झाल्यास त्या कर्मचाऱ्याने नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीने किंवा जर त्या कर्मचाऱ्याने नामनिर्देशन केले नसेल, तर कायदेशीर वारसाने कर्मचाऱ्याच्या मूळ मृत्यू प्रमाणपत्रासह सानुग्रह अनुदान रुपये १० लक्ष मिळण्यासाठी कार्यालय प्रमुख/ आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडे या सोबतच्या विहित नमुन्यात (परिशिष्ट-१) मध्ये अर्ज सादर करावा.

२) **कार्यालय प्रमुख/ आहरण व संवितरण अधिकाऱ्याने करावयाची कार्यवाही :-** कार्यालय प्रमुख /आहरण व संवितरण अधिकाऱ्याने मृत कर्मचाऱ्याच्या नामनिर्देशित व्यक्ती/ कायदेशीर वारसाचा मूळ अर्ज परिशिष्ट-१, मूळ मृत्यू प्रमाणपत्र, सेवा पुस्तकाचे प्रथम पान तसेच प्रथम नियुक्तीची नोंद असलेल्या पानाची सांक्षाकित प्रत, सेवार्थ आयडी, डिसीपीएस सभासद असल्याचे प्रमाणपत्र, डिसीपीएस क्रमांक/ प्रान क्रमांक, शासन सेवेतील नियुक्तीचे सक्षम प्राधिकाऱ्याचे आदेश यासह या सोबतच्या परिशिष्ट-२ मध्ये विभाग प्रमुखांमार्फत प्रशासकीय विभागाच्या प्रमुखांकडे शिफारशीसह प्रस्ताव सादर करेल.

३) **प्रशासकीय विभाग प्रमुखाने करावयाची कार्यवाही :-** कार्यालय प्रमुख/ आहरण व संवितरण अधिकारी / विभाग प्रमुख यांचेकडून परिशिष्ट-२ मध्ये प्रस्ताव प्राप्त झाल्यावर त्या सोबतचे दस्ताऐवज/ प्रमाणपत्रे इ. चे आधारे खात्री करुन सोबतच्या परिशिष्ट-३ मध्ये प्रशासकीय विभाग प्रमुख सानुग्रह अनुदान मंजूरी आदेश निर्गमित करेल. आदेशाची एक प्रत संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी, दुसरी प्रत कार्यालय प्रमुख / आहरण व संवितरण अधिकारी / विभाग प्रमुख

Scanned by CamScanner

आणि तिसरी प्रत (स्वाक्षरीत) कर्मचाऱ्याच्या वारसास पाठविण्यात यावी. चौथी प्रत (कार्यालयीन प्रत) प्रशासकीय विभाग प्रमुख यांनी त्यांचे कार्यालयीन अभिलेख्यात जतन करावी.

४) कार्यालय प्रमुख / आहरण व संवितरण अधिकारी परिशिष्ट-३ मधील मंजूरी आदेशाच्या आधारे कोषागारास देयक सादर करतील. सदर देयक नमुना महाराष्ट्र कोषागार नियम ४५-ए मध्ये सादर करण्यांत यावे.

परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत प्रदान करण्यात येणारी सानुग्रह अनुदानाची रक्कम "मागणी क्र६-जी. निवृत्तीवेतन व इतर-२०७१सेवानिवृत्ती लाभ नागरी ०१, ,१०३अनुकंपा भत्ते,राष्ट्रीय निवृत्तीवेतन / परिभाषित अंशदान-(०६)(००) (२०७१०७२२)योजनेंतर्गत सानुग्रह अनुदान" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावी.

Scanned by CamScanner

परिशिष्ट- १

**परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत शासकीय कर्मचाऱ्यांच्या नामनिर्देशित व्यक्तीने / वारसाने सानुग्रह अनुदान मागणीबाबत करावयाचा अर्ज**

कर्मचाऱ्याच्या नामनिर्देशित व्यक्ती / वारसाचे नाव व पूर्ण पत्ता :-

--------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------

दिनांक :-------------------------------

प्रति,

कार्यालय प्रमुख/ आहरण व संवितरण अधिकारी,

कार्यालयाचे नाव व पत्ता

विषय:- परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना / राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत सानुग्रह अनुदान मिळणेबाबत.

महोदय,

१) कै. श्री/ श्रीमती ----------------------------हे / ह्या राज्य शासनाच्या सेवेत दिनांक -------------- ते --------------- कार्यरत होते/ होत्या. सेवेत असतांना दिनांक ---------------- रोजी त्यांचे निधन झाले आहे. सेवेत असतांना ते / त्या परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना या योजनेचे सभासद होते/ होत्या.

त्यांनी परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत रक्कम मिळण्यासाठी मला नामनिर्देशित केले आहे / नाही. (नसल्यास ____________ मी त्यांचा कायदेशीर वारस ठरत आहे.) त्यामुळे उपरोक्त या योजनेअंतर्गत देय केलेले सानुग्रह अनुदान मिळावे, ही विनंती. यासोबत मी कै. श्री/ श्रीमती --------------- यांच्या मृत्यूच्या दाखल्याची मूळ प्रत जोडत आहे. त्यांचेशी माझे नाते पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नांव | मयत कर्मचाऱ्याशी नाते |
|---|---|---|
| | | |

Scanned by CamScanner

२) कर्मचाऱ्याचा आवश्यक तपशील खालीलप्रमाणे आहे -----

| कर्मचाऱ्यांचे नांव | सेवार्थ आयडी /DCPS क्रमांक /PRAN क्रमांक | सेवेत रुजू झाल्याची तारीख |
|---|---|---|
| | | |

सोबत :- १) मृत्यूचा दाखला (मूळ प्रत)

२) वारस प्रमाणपत्र

स्थळ :-

दिनांक :- आपला/ आपली विश्वासू,

( )

Scanned by CamScanner

## परिशिष्ट- २

**कार्यालय प्रमुख/ आहरण व संवितरण अधिकाऱ्यांने परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योज**
**राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजने अंतर्गत शासकीय कर्मचाऱ्याच्या नामनिर्देशित व्यक्तीस/ वार**
**सानुग्रह अनुदान मंजूरीबाबत प्रशासकीय विभाग प्रमुखास करावयाचा अर्ज.**

कार्यालयाचे नाव व पत्ता :-------------------

-----------------------------------------

-----------------------------------------

दिनांक : ----------------------------

प्रति,

प्रशासकीय विभाग प्रमुख

--------------------------------

--------------------------------

विषय:- परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजने अंतर्गत सभासदाच्या नामनिर्देशित व्यक्तीस / कायदेशीर वारसास सानुग्रह अनुदान मंजूर करण्याबाबत.

महोदय,

या कार्यालयात कार्यरत असलेले कर्मचारी श्री / श्रीमती ------------------- यांचे दिनांक ---------रोजी निधन झाले. सदर कर्मचारी राज्य शासनाच्या सेवेत असतांना परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना या योजनेचे सभासद होते. उपरोक्त कारणामुळे कर्मचाऱ्याची सेवा संपुष्टात आल्यामुळे शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अंनियो-२०१७/प्र.क्र.२९/सेवा-४ दि.    सप्टेंबर, २०१८ अनुसार सानुग्रह अनुदान मिळणेबाबत त्यांनी नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीचा / नामनिर्देशन नसल्याने कायदेशीर वारसदाराचा अर्ज

Scanned by CamScanner

प्राप्त झालेला आहे. त्या अनुषंगाने सदर कर्मचाऱ्याचा तपशील पुढीलप्रमाणे प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| नांव, पदनाम | सेवार्थ आयडी / DCPS क्रमांक / PRAN क्रमांक | सेवेत रुजू झाल्याचा दिनांक | मृत्यू दिनांक | मृत्यूच्या दिनांकास झालेली सेवा/ वर्षे / महिना/ दिवस | कोषागाराचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

यासोबत खालील नमुद केल्याप्रमाणे आवश्यक दस्ताऐवज सादर करण्यात येत आहे.

१) नामनिर्देशित व्यक्ती / कायदेशीर वारसदाराचा अर्ज- परिशिष्ट-१ (मुळ प्रत)

२) मृत्यूचा दाखला (मुळ प्रत)

३) वारस प्रमाणपत्र (मूळ प्रत)

४) कर्मचाऱ्यांच्या शासन सेवेतील नियुक्ती आदेशाची सांक्षाकित प्रत

५) कर्मचाऱ्याच्या सेवापुस्तकाचे प्रथम पान तसेच प्रथम नियुक्तीची नोंद असलेल्या पानाची सांक्षाकित प्रत

६) डिसीपीएस / एनपीएस सभासद असल्याचे प्रमाणपत्र

७) कर्मचाऱ्याकडून शासकीय येणे बाकी नसल्याचे प्रमाणपत्र

तरी, सदर नामनिर्देशित व्यक्ती / नामनिर्देशन नसल्याने कायदेशीर वारस श्री / श्रीमती ________________________ यांना रु.१० लक्ष सानुग्रह अनुदान मिळण्यास शिफारस आहे.

आपला / आपली विश्वासू,

स्वाक्षरी

(कार्यालय प्रमुख/ आहरण व संवितरण अधिकारी)

Scanned by CamScanner

• याच नमुन्यात विभाग प्रमुखाने प्रशासकीय विभागास अर्ज करावा. (आवश्यक त्या फेरफारासह)

## परिशिष्ट-३

क्रमांक.

प्रशासकीय विभाग प्रमुख ------------------

------------------------------------------

कार्यालयाचे नाव व पत्ता :-----------------

------------------------------------------

दिनांक : -------------------------------

वाचा:-

१) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : अंनियो-२०१७/प्र.क्र.२९/सेवा-४, दि. सप्टेंबर, २०१८.

२) ----------------------- कार्यालय प्रमुख/ आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडून / विभाग प्रमुखांकडून प्राप्त झालेल्या दिनांक ---------- रोजीचा सानुग्रह अनुदान मंजुरीचा प्रस्ताव.

३) कर्मचाऱ्याचे नाव --------------------- यांचे नामनिर्देशित व्यक्ती / कायदेशीर वारसदार श्री/ श्रीमती-------------------------- यांचा परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना/ राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत सानुग्रह अनुदान मिळण्याकरीता प्राप्त झालेला दिनांक ------------ रोजीचा अर्ज.

## आदेश

उपरोक्त क्रमांक २ अन्वये ---------------------------- यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावासोबत श्री/ श्रीमती ----------------------------- यांच्यावर क्रमांक ३ येथे नमूद केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने प्रशासकीय विभाग प्रमुख हे त्यांना संदर्भ क्रमांक १ येथील वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : अंनियो-२०१७/प्र.क्र.२९/सेवा-४, दि. सप्टेंबर, २०१८ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, श्री / श्रीमती ------------------------- यांच्या

Scanned by CamScanner

नामनिर्देशित व्यक्तीस /नामनिर्देशन नसल्याने कायदेशीर वारसास श्री / श्रीमती -------------
-------------------- यांना सानुग्रह अनुदान रुपये १०,००,०००/ (अक्षरी रुपये दहा लाख फक्त) मंजूर करीत आहेत.

सदर "सानुग्रह अनुदान" शासकीय कर्मचारी सेवेत असताना १० वर्ष शासन सेवा होण्यापूर्वी दिनांक -------रोजी मृत्यू पावल्यामुळे मंजूर करण्यात येत आहे. सदर आदेश आदेशाच्या दिनांकापासून १ वर्षे कालावधीसाठी ग्राह्य राहतील.

सदरचा खर्च "मागणी क्र.जी-६ २०७१-निवृत्तीवेतन व इतर सेवानिवृत्ती लाभ ०१ नागरी,१०३, अनुकंपा भत्ते,(००)(०६)-परिभाषित अंशदान / राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेंतर्गत सानुग्रह अनुदान(२०७१०७२२)" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावी.

**प्रशासकीय विभाग प्रमुख**

--------------------,

प्रत:- १) अधिदान व लेखा अधिकारी/ कोषागार अधिकारी यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.

२) ------------------ कार्यालय प्रमुख/ आहरण व संवितरण अधिकारी यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.

३) श्री/ श्रीमती ------------------------------------------ यांना माहितीस्तव.

Scanned by CamScanner

राज्य शासनाच्या सेवेत १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी लागू केलेल्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेच्या (NPS) ( पूर्वीची परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना-DCPS) अमंलबजावणीतील त्रुटींचा अभ्यास करण्यासाठी अभ्यासगटची स्थापना करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांक - संकीर्ण २०१८/प्र.क्र. ३४६/सेवा-४**
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक :- १९ जानेवारी,२०१९

**शासन निर्णय:-**

राज्य शासनाच्या सेवेत १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (NPS) ( पूर्वीची परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना-DCPS) लागू करण्यात आली आहे. सदर योजनेची अमंलबजावणी करताना येणाऱ्या अडचणींच्या अनुषंगाने विविध संघटनांनी सदर योजनेमधील त्रुटी निदर्शनास आणल्या आहेत. या अडचणींचे निराकरण करण्याच्या दृष्टीने आणि या योजनेची परिणामकारकरित्या अमंलबजावणी करण्याच्या दृष्टीने एक अभ्यासगट स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार खालीलप्रमाणे अभ्यासगट स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

| अ.क्र. | पदनाम | |
|---|---|---|
| १. | अध्यक्ष | मा. राज्यमंत्री (वित्त) |
| २. | सदस्य | मा. राज्यमंत्री (सा.प्र.वि.) |
| ३. | सदस्य | मा. अपर मुख्य सचिव (वित्त) |
| ४. | सदस्य | मा. अपर मुख्य सचिव (सा.प्र.वि.) |
| ५. | सदस्य | मा. प्रधान सचिव (ले.व.को) |
| ६. | सदस्य | उपसचिव शालेय शिक्षण |
| ७. | सदस्य सचिव | संचालक, लेखा व कोषागार |

३. सदर अभ्यासगटाने नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेच्या अमलबजावणीतील त्रुटींचा अभ्यास करुन या योजनेमध्ये येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्याच्या दृष्टीने अभ्यास करुन त्याबाबतचा अहवाल शासनास ३ महिन्यात सादर करावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०११९१७००४५१६०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकेत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

INDRAJEET SAMBHAJI GORE

Digitally signed by INDRAJEET SAMBHAJI GORE
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=6015944fe7d58a83f4a54c43147b5da1e34861e2984e9f793bb6f7249aaa9c1a, postalCode=400032, street=Y-5/66,GOVERNMENT COLONY,MUMBAI,
serialNumber=d494742192306fcc1dea9aadd3810639506519fa652b919767b98b04e905a18, ou=FINANCE DEPUTY SECRETARY
o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=INDRAJEET SAMBHAJI GORE
Date: 2019.01.19 17:09:53 +05'30'

(इंद्रजित गोरे)
शासनाचे उप सचिव

प्रत,

१) मा. राज्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव

Scanned by CamScanner

जिल्हा कोषागार कार्यालय,सोलापूर
DISTRICT TREASURY OFFICE,SOLAPUR
Collector Office Compound, Solapur-413001

E-mail-to.solapur@zillamahakosh.in Phone: 0217-2731036 Fax No. 0217-2624627

## परिपत्रक

07 FEB 2018

सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना कळविण्यात येते की,निवृत्तीवेतन विनियामक व विकास प्राधिकरण यांचेकडील दि.10 जानेवारी 2018 च्या निर्गमित झालेल्या परिपत्रकान्वये राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेतर्गत Partial Withdrawal अंतर्गत खालील कारणास्तव दावा(Claim) मंजुर होऊ शकतो

1. एकुण जमा रक्कमेपैकी वर्गणीदाराच्या हिस्साच्या जमा रक्कमेच्या जास्तीत जास्त 25 टक्के इतकी रक्कम एकावेळी खालील हेतूसाठी काढता येईल.
   a) वर्गणीदाराच्या मुलांचे उच्च शिक्षण यामध्ये कायदेशीर दत्तक घेतलेल्या मुलांचाही समावेश राहील.
   b) वर्गणीदाराच्या मुलांचे विवाहावरील खर्च भागविण्यासाठी यामध्ये कायदेशीर दत्तक घेतलेल्या मुलांचाही समावेश राहील.
   c) राहते घराचे बांधकाम करण्यासाठी किंवा तयार घर खरेदी करण्यासाठी स्वत:च्या नावे किंवा पत्नीसह संयुक्त नावाने खरेदी करण्यासाठी. तथापि,ज्या प्रकरणी वर्गणीदाराने त्यास मिळणाऱ्या पिढीजात घराव्यतिरिक्त वैयक्तिक अथवा संयुक्त (पत्नीसह) घर कोठेही खरेदी केले असेल तर या योजनेत अग्रीम मंजुर असणार नाही.
   d) वर्गणीदार त्यांचे कायदेशीर पत्नी,त्याची मुले (दत्तक मुलासह) तसेच त्याच्यावर अवलंबून असणारे आई वडील यांचा वैदयकिय खर्च भागविण्यासाठी.
   e) वैदयकीय आजाराची यादी सोबतच्या परिपत्रकात नमुद केली आहे.

**अटी व शर्थी :-**

1 वर्गणीदाराच्या दावा (Claim) मागणीच्या दिनांकास अखंडित अर्हताकारी सेवा 3 वर्षे पुर्ण असली पाहिजे.

2. अर्जाच्या तारखेस एकुण जमा रक्कमेपैकी वर्गणीदाराच्या हिस्साच्या 25 टक्के पेक्षा जास्त नाही इतकी रक्कम काढता येईल.

3. वर्गणीदारास एकुण सेवा कालावधीत जास्तीत जास्त 3 वेळा वरील नमूद कारणास्तव रक्कम काढता येईल.तसेच पहिली रक्कम काढल्यानंतर दुस-यादा रक्कम काढण्यासाठी कालावधी हा 5 वर्ष इतका राहील. तसेच दुसऱ्यांदा रक्कम काढताना पहिला दावा मंजुर झाल्यानंतर जी रक्कम त्याचे खाती जमा होईल त्यांचे 25% इतकीच रक्कम मंजुर होईल याची नोंद घ्यावी. सदरचा नियम खालील उदाहरणावरुन आणखीन स्पष्ट होईल.

उदा.:- अ कर्मचाऱ्याचे अर्जाच्या 01/01/2015 दिनांकास त्यांचे खाती एकुण 20000/- रुपये जमा आहेत पैकी 10000/- चे 25% म्हणजेच 2500/- इतकी रक्कम त्यास मिळू शकते. तदनंतर 5 वर्षानंतर म्हणजेच 01 जानेवारी 2020 रोजी दुसऱ्यादा दाव्याची (Claim) मागणी केल्यास पहिला दावा मंजुरी नंतर त्यांचे खाती पुनश्च 5000/- रुपये जमा झाले असतील तर त्याचे 25% म्हणजेच रुपये 1250/- इतकी रक्कम नियमानुसार मंजुर होईल.

**अग्रीम मंजुर करताना प्रस्तावासोबत दयावयाचे प्रमाणपत्र :-** मा.उपसंचालक राज्य अभिलेख देखभाल अभिकरण मुंबई यांनी दि.18/01/2018 अन्वये केलेल्या सूचनानुसार Partial Withdrawal दावे (Claims) मंजुर करताना प्रस्तावासोबत खालील प्रमाणपत्रे सहपत्रित करणे अत्यंत आवश्यक आहे.

Scanned by CamScanner

Scanned by CamScanner

1.वर्गणीदाराच्या खात्यातील जमा रक्कमेचा ताळमेळ घेऊन कोणत्याही महिन्याचे अंशदान गहाळ नसल्याचे प्रमाणित करणे.

2.स्तर 2 (Tier-2) खालील म्हणजेच 6 व्या वेतन आयोगानुसार पाच हप्त्यांच्या रक्कमा नियमित अंशदानात म्हणजेच स्तर-1 (Tier-1) मध्ये समाविष्ट झाल्या नसल्याचे प्रमाणित करणे.प्रस्ताव दोन प्रतित योग्य त्या सांक्षाकनासह नमुना Form 601PW मध्येच सादर करावा.

**निवृत्तीवेतन विनियामक व विकास प्राधिकरण (PFRDA) यांचेकडील वरील नियमावावत निर्गमित झालेले आदेश दिनांक 24 ऑक्टोबर 2016 व दि.10 जानेवारी 2018 मध्ये नमुद केल्यानुसार आहरण व संवितरण अधिकाऱ्यांने ज्या हेतूसाठी दाव्याची मागणी आलेली आहे. त्यासंदर्भात आवश्यक असणारे कागदपत्राची काळजीपूर्वक पडताळणी करुन आपल्या कार्यालयीन प्रतीस जतन करुन ठेवायची आहे.**

कोषागार अधिकारी
सोलापूर

---

जा.क्र.कोषा/ NPS/P withdrawal/परिपत्रक/५५१/ 2018 दि. 31/01/2018

प्रति,

1. आहरण व संवितरण अधिकारी सर्व
 यांना वरील सूचनांन्वये माहिती व कार्यवाहीस्तव सादर.
2. उपकोषागार अधिकारी सर्व
 यांना आदेशित करण्यात येते की, सदरचे परिपत्रक आपल्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर डकवून सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दयावे.

सोबत :- PFRDA यांचे वरील नमुद केलेल्या तारखांचे परिपत्रके.

Scanned by CamScanner

Scanned by CamScanner

नवीन परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना
स्पष्टीकरण .........

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : अंनियो १००६/८७/सेवा ४
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक :१२ जानेवारी २००७

## परिपत्रक

शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : अंनियो १००५/१२६/सेवा ४, दिनांक ३१ ऑक्टोबर २००५ अन्वये राज्य शासनाच्या सेवेत १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांसाठी नवीन "परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना" लागू करण्यात आली आहे.

२. वरील योजनेसंदर्भात शासन आणखी असा खुलासा करीत आहे की, ज्या शासकीय कर्मचाऱ्याने १ नोव्हेंबर २००५ पूर्वी शासन सेवेत निवृत्तियेतनार्ह आस्थापनेवर कार्यरत असताना त्याच किंवा अन्य विभागातील निवृत्तीयेतनार्ह आस्थापनेच्या पदावरील नियुक्तीसाठी अर्ज केला असेल आणि त्यास १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नवीन पदावर नियुक्त करण्यात आले असेल तर अशा प्रकरणी खालील सर्व अटींची पूर्तता झाल्यास संबंधित शासकीय कर्मचाऱ्यास महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू ठरतील. :-

i) शासकीय कर्मचाऱ्याची अगोदरची नियुक्ती नियमित स्वरुपाची असावी, म्हणजेच त्या शासकीय कर्मचाऱ्याची संबंधित पदासाठी विहीत करण्यात आलेल्या नियुक्ती नियमांच्या तरतूदींची (उदा. वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत /निवड मंडळामार्फत नियुक्ती इत्यादीबाबींची) पूर्तता करुन नियुक्ती झालेली असावी.

ii) शासकीय कर्मचाऱ्याने अगोदरच्या पदाचा परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण केलेला असावा.

iii) शासकीय कर्मचाऱ्याने नवीन पदासाठी केलेला अर्ज संबंधित कार्यालयाव्दारे/संबंधित प्रशासकीय प्राधिकाऱ्याची योग्यरित्या पूर्वपरवानगी घेऊन केलेला असावा.

iv) उपरोक्त दोन नियुक्त्यांमध्ये जर खंड असेल तर त्या खंडाचा कालावधी बदलीच्या नियमांनुसार अनुज्ञेय असलेल्या पदग्रहण अवधीहून अधिक नसावा.

वर नमूद केलेल्या सर्व अटींची पूर्तता ज्या प्रकरणी होत नसेल, अशा शासकीय कर्मचाऱ्यास नवीन परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना लागू ठरेल.

३. वरील स्पष्टीकरण, जिल्हा परिषदा तसेच ज्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तिवेतन योजना व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी लागू आहे, अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषितर विद्यापीठे आणि त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषि विद्यापीठे इत्यादींच्या सेवेमध्ये १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी, *योग्य त्या फेरफारांसह*, लागू ठरेल.

४. हे शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २००६१२२०१५०७५७००१ असा आहे.

५ या शासन परिपत्रकाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

उषा प्र. महाजन
शासनाच्या उप सचिव

प्रति,
प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (१२५ प्रती)
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती)
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष (प्रत्येकी ५ प्रती)

रोटा/एच - १८९५(१३,०००+१०-०१-२००७)

Scanned by CamScanner

"परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन [illegible]
अंमलबजावणीची [illegible]
अंशदानाची वसुली - आहरण व संवितरण [illegible]
सूचना

# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग

शासन परिपत्रक, क्रमांक : अंनियो १००७/६७ /सेवा- ४
मंत्रालय, मुंबई - ४०० ३२, दिनांक ३० ऑक्टोबर, २००७

वाचा :- १) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. अंनियो १००७/१८/सेवा - ४ [illegible]
२)शासन परिपत्रक, क्रमांक : अंनियो १००७/६७ /सेवा- ४, दि. २८ सप्टेंबर [illegible]

## परिपत्रक

शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. अंनियो १००७/१८/सेवा -४, दि. ७ जुलै २००७ अन्वये [illegible] निवृत्तिवेतन योजनेची अंमलबजावणी सविस्तरपणे विहित करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयाच्या [illegible] अशा सूचना देण्यात आल्या आहेत की, दि. १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे नमुना [illegible] आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी प्राप्त करावेत आणि ते राज्य अभिलेख देखभाल अभिकरणाकडे [illegible] पाठवावेत. त्याचप्रमाणे उपरोक्त शासन निर्णयाच्या परिच्छेद क्र. १४ मध्ये असे निदेश देण्यात आलेले आहेत [illegible] कर्मचाऱ्यांच्या वेतनातून करावयाची अंशदानाची वसुली माहे सप्टेंबर २००७ च्या वेतनातून (जे ऑक्टोबर [illegible]) सुरु करण्यात यावी. तथापि लेखा क्रमांक देण्याची कार्यवाही विहीत वेळेत पूर्ण झाली नसल्याने [illegible] करावयाच्या अंशदानाच्या वसुलीची मुदत, शासन परिपत्रक, क्र: अंनियो १००७/६७ /सेवा- ४, दि. २८ [illegible] एका महिन्याने वाढविण्यात आली. मात्र शासनाच्या आता असे निदर्शनास आले आहे की, काही प्रमाणात [illegible] नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांकडून विहीत नमुन्यात माहिती प्राप्त करुन घेवून त्यांचे अर्ज राज्य अभिलेख देखभाल [illegible] पाठविण्यात आले नाहीत किंवा अशा कर्मचाऱ्यांना अद्याप निवृत्तिवेतन लेखा क्रमांक देण्याची कार्यवाही पूर्ण झालेली [illegible]

२. वरील परिस्थिती विचारात घेऊन, सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना व कोषागार कार्यालयांना अशा सूचना देत आहेत की, कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन लेखा क्रमांक मिळाला नसल्यास, अशा कर्मचाऱ्यांच्या बाबतीत निवृत्ती[illegible] क्रमांकाची वाट न पाहता, त्यांच्या माहे ऑक्टोबर २००७ च्या (जे नोव्हेंबर २००७ मध्ये देय ठरेल) वेतनातून अंशदान[illegible] करुन, वेतनाची देयके सादर करावीत. दरम्यान अशा कर्मचाऱ्यांचे अर्ज राज्य अभिलेख देखभाल अभिकरणाकडे [illegible] निवृत्तिवेतन लेखा क्रमांक घेण्याची कार्यवाही विनाविलंब करण्यात यावी व त्या पुढील महिन्यात अंशदान [illegible] विवरणपत्र सादर करावे.

३. निवृत्तीवेतन लेखा क्रमांकासह सुधारीत विवरणपत्र राज्य अभिलेख देखभाल अभिकरणाकडे [illegible] कपात केलेली विवरणपत्रे कोषागार कार्यालयाने जतन करावीत.

४. हे आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाइटवर उपलब्ध करण्यात [illegible] संकेतांक २००७१०३०१८२१०३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

(स्वाक्षरी)
उषा प्र. महाजन
शासनाच्या उप सचिव

प्रति,

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई (५ प्रती).
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर

Scanned by CamScanner

नवीन "परिभाषित अंशदान नियृत्तीवेतन योजनेच्या"अंमलबजावणीच्या कार्यपध्दतीबाबत अधिकार प्रत्यायोजन

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
शासन निर्णय, क्रमांक : अंनियो १००७/१८/सेवा- ४
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक ३ डिसेंबर २००७

वाचा :- शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. अंनियो १००७/१८/सेवा -४, दि. ७ जुलै २००७

## निर्णय

**प्रस्तावना**

शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. अंनियो १००७/१८/सेवा -४, दि. ७ जुलै २००७ अन्वये नवीन परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजनेच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. मात्र, राज्य अभिलेख देखभाल अभिकरणाने आता असे निदर्शनास आणून दिले आहे की, ही योजना लागू झाल्यापासून प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या लक्षात घेता, निवृत्तिवेतन लेखा क्रमांक देण्याकरीता आणि जमा होणाऱ्या रकमांच्या लेखांकनाकरीता लागणारी माहिती राज्य अभिलेख देखभाल अभिकरणाकडे प्राप्त होण्यास तसेच ती माहिती संगणकावर घेऊन अंतिमत: लेखाकंन पूर्ण करण्यास लागणारा कालावधी लक्षात घेता, त्या संदर्भात संगणकीकरण अत्यावश्यक झाले आहे. तसेच नव्याने शासन सेवेत दाखल होणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या पहाता, त्यांची माहिती नोंदवून दिलेल्या कार्यपध्दतीनुसार अंशदानाच्या रकमांची वसुली व लेखाकंन इत्यादी कामात होणारी वाढ व संपूर्ण कार्यवाहीची व्यापकता विचारात घेता, शासन आंता पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**निर्णय**

शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. अंनियो १००७/१८/सेवा -४, दि. ७ जुलै २००७ मधील परिच्छेद ५ व ८ मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

५. राज्य अभिलेख देखभाल अभिकरण लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांच्या प्रशासकीय अधिपत्याखाली कार्य करेल. **आवश्यकतेप्रमाणे संचालक, लेखा व कोषागारे हे त्यांच्या अधिनस्त इतर कोणत्याही अधिका-यांना या संदर्भातील अधिकार प्रत्यायोजित करु शकतील.**

**कर्मचाऱ्यांकडुन माहिती प्राप्त करणे.**

८. शासकीय विभाग/कार्यालयातील आहरण व संवितरण अधिकारी प्रत्येक कर्मचाऱ्याकडून, त्याच्या/त्रिच्या नियुक्तीनंतर लगेच, निवृत्तिवेतन लेखा क्रमांक प्राप्त करण्याचा अर्ज, विहीत नमुना- १ मध्ये तीन प्रतीत प्राप्त करील आणि त्या तीनही प्रती राज्य अभिलेख देखभाल अभिकरणाकडे थेट पाठविल. जे कर्मचारी १ नोव्हेंबर, २००५ ते या आदेशाचा दिनांक यामधील कालावधीत नियुक्त झालेले असतील त्यांचा नमुना-१ मधील अर्ज सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी प्राप्त करावा आणि राज्य देखभाल अभिलेख अभिकरणाकडे दि १५ ऑगस्ट, २००७ पूर्वी न चुकता पाठविण्याची दक्षता घ्यावी. नमुना- १ खालील वचनपत्रावर संबंधित कर्मचाऱ्याने स्वाक्षरी केलेली आहे, याची खातरजमा आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी करुन घ्यावी.

**या योजनेकरीता संगणक प्रणाली विकसित करण्यात आल्यास आहरण व संवितरण अधिकारी संबंधित कर्मचाऱ्याची माहिती संगणक प्रणालीवर भरेल आणि त्या आधारे नमुना- १ मधील अर्जाच्या तीन प्रती काढेल. त्यावर संबंधित कर्मचाऱ्याची स्वाक्षरी घेईल व आहरण व संवितरण अधिकाऱ्याने दयावयाच्या प्रमाणपत्रावर स्वाक्षरी करुन वर नमूद केल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करेल.**

२. हे आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २००७१२०४१३१३३८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ना. ना. भडीकर**
**शासनाचे उप सचिव**

प्रति,

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (१२५प्रती),

महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर (१२५ प्रती),

ROTA/H-1910(10,000+40-12-2007)-1

(P.T.O.

Scanned by CamScanner

परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन
योजनेच्या कार्यपद्धतीबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग, मंत्रालय
मुंबई ४०० ०३२.
शासन निर्णय क्र. संकीर्ण-१००९ /प्र.क्र.३९/कोषाप्र-५
दिनांक : ३ एप्रिल २०१०.

वाचाः- १) शासन निर्णय क्र. अंनियो -१००७/१८/सेवा-४, दिनांक ७ जुलै २००७
२) शासन निर्णय क्र. अंनियो -१००७/१८/सेवा-४, दिनांक ३ डिसेंबर २००७
३) शासन निर्णय क्र. अंनियो -१००७/६९/सेवा-४, दिनांक ३० जानेवारी २००९

प्रस्तावना : संदर्भांकित शासन निर्णयांद्वारे परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या अंमलबजावणी संदर्भातील कार्यपद्धती व त्यातील सुधारणांबाबत कळविण्यात आले आहे. या योजनेच्या अंमलबजावणीकरिता तयार करण्यात आलेल्या संगणक कार्यक्रमांतर्गत कार्यवाही करण्यात अडचणी येत असल्याबाबत आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी कळविले होते. त्यामुळे आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या अडचणी दूर करुन सुलभरित्या या योजनेखालील कपातीबाबतची माहिती संगणीकृत कार्यक्रमावर नोंदली जावी यासाठी प्रणालीत बदल करण्यात आलेले आहेत. त्यामुळे आता आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना ऑन लाईन पद्धतीने नमुना क्रमांक -२ मधील मासिक अनुसूची तयार करण्याची आवश्यकता नाही. नवीन संगणकीय कार्यक्रम अंमलात येत असल्यामुळे कार्यपद्धतीत काही सुधारणा करणे आवश्यक होते. त्यामुळे शासन या संदर्भात आता खालीलप्रमाणे आदेश देत आहे : —

**शासन निर्णय.—** या आदेशाच्या दिनांकापासून नमुना क्रमांक - २ मधील कर्मचाऱ्यांच्या अंशदानाची अनुसूची तयार करण्याकरिता व त्यांना मान्यता देऊन त्यामधील माहिती केंद्रीय सर्व्हरवर भरण्याकरिता पुढे नमूद केलेल्या कार्यपद्धतीप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी,—

(१) 'सेवार्थ' मधून वेतन देयक तयार करणाऱ्या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांव्यतिरिक्त इतर सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेकरिता तयार केलेल्या ऑफ लाईन मॉडयुलमधूनच यापुढे वसुलीच्या अनुसूची तयार कराव्यात.

(२) आहरण व संवितरण अधिकाऱ्याने कर्मचाऱ्यांच्या प्रथम नियुक्तीच्या महिन्यानंतरच्या महिन्यात वसुली सुरु करावी. त्याकरिता प्रथम त्यांनी ऑन लाईन प्रणालीवर जाऊन ऑफ लाईन मॉडयुल त्यांच्या संगणकावर डाऊन लोड करावे.

(३) अशा प्रकारे डाऊन लोड केलेल्या ऑफ लाईन मॉडयुलमध्ये वसुलीची माहिती भरून पुढील प्रत्येक महिन्याकरिता अनुसूची तयार करावी. अशी अनुसूची ज्या महिन्यात वसुली करावयाची आहे त्या महिन्याकरिता किंवा त्याच्या भागाकरिता, तसेच त्यापूर्वीच्या कोणत्याही महिन्याकरिता (किंवा त्याच्या भागाकरिता) तयार करता येईल. अशा अनुसूचीवर त्या ऑफ लाईन पद्धतीने तयार केल्याबाबत प्रणालीद्वारे विशिष्ट प्रकारे नोंद केली जाईल.

(४) आहरण व संवितरण अधिकाऱ्याने ऑफ लाईन मॉडयुलमधून तयार केलेल्या अनुसूचीच्या तीन प्रती मुद्रीत करुन घेऊन त्यावर स्वाक्षरी करून दोन प्रती वेतन देयकासोबत जोडाव्या व एक प्रत स्थळप्रत म्हणून कार्यालयीन अभिलेखात जतन करावी.

(५) सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी या ऑफ लाईन मॉडयुलचा वापर करून या योजनेखालील मासिक अनुसूची तयार कराव्यात. असे करणे अगदीच शक्य नसल्यास हाताने अनुसूची तयार करून त्याच्या दोन प्रती स्वाक्षरी करून वेतन देयकासोबत जोडाव्या.

(६) 'सेवार्थ' च्या ऑन लाईन पद्धतीने वेतन देयक तयार करणाऱ्या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकरिता परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनेखालील मासिक अनुसूची प्रणालीमधूनच तयार होतील. अशा अनुसूचीच्या तीन प्रती काढून, त्यावर स्वाक्षरी करुन दोन प्रती आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी वेतन देयकासोबत जोडाव्यात आणि एक प्रत स्थळप्रत म्हणून ठेवावी.



Scanned by CamScanner